3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास
सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स

प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज
ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664
9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड,
पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक
पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २७२ वा ● बुधवार, ता. २६ मार्च २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code
रयत समाचार चॅनल
Scan QR Code
इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

१ एप्रिल २०२५ पासून पुर्णवेळ आपल्यासेवेत...
श्रीलक्ष्मी
होमिओपॅथिक क्लिनिक
डॉ. विद्या गायकवाड | 7588092673
वेळ : सकाळी ११ ते दुपारी ३, संध्याकाळी ५ ते रात्री ९
पत्ता : दर्पण बिल्डिंग, श्रीपाद मेडिकलच्यावर,
शनी-मारुती मंदिराशेजारी,
दिल्लीगेट वेशीच्या बाहेर, अहिल्यानगर-४१४००१
कृपया, फोन करुन येणे
सर्व आजारांवर होमिओपॅथिक औषधोपचार केले जातील
आजाराचे निदान व समुपदेशन केले जाईल

# कलादिग्दर्शक नितीन देसाईंच्या एनडीस् आर्ट वर्ल्डचे १३० कोटी प्रदान

## चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या ताब्यात स्टुडिओ



**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

दिवंगत कलादिग्दर्शक नितीन देसाई (Nitin Desai) यांनी उभारलेला कर्जत येथील एन.डी.स्टुडीओ (NDStudio) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने परिचालनासाठी ताब्यात घेतला. एनडीस आर्ट वर्ल्डचे संपूर्ण दायित्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

मंगळवारी ता.२५ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विधानभवन येथे दायित्वपूर्ती सोहळा संपन्न झाला. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार , उद्योग मंत्री उदय सामंत, राज्यमंत्री (वित्त व नियोजन) आशिष जैस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील आदी उपस्थित होते. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय कंपनी कायदा प्राधिकरण यांनी सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक दिवंगत श्री नितीन चंद्रकांत देसाई यांचा ' परिचालनासाठी महाराष्ट्र शासना अंतर्गत फिल्मसिटी मुंबईकडे सोपवण्यात यावा, असा निर्णय दिला. याकरिता नियोजित दायित्व पूर्तता कालावधी ता. १४ मे २०२५ पर्यंत असूनही १०० दिवसाच्या वचनपूर्तीच्या अनुषगाने जलदगतीने निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे परिचालन व रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महामंडळ नियोजन करत आहे.

एनडीस आर्ट वर्ल्डचा ४७ एकरचा विस्तीर्ण परिसर आहे. या परिसरात चित्रीकरणे, समारंभ, पर्यटन, फोटोशूट, मेळावे, प्रशिक्षण अशा अनेक गोष्टी करता येतील. अनेक पौराणिक, ऐतिहासिक, मराठी, हिंदी चित्रपटांचे, मालिकांचे, जाहिरातींचे शूटिंग याठिकाणी करता येऊ शकते. विविध वास्तूंच्या प्रतिकृती आणि भव्य दिव्य सेट याठिकाणी आहेत.

# 'किर्लोस्कर'ने वेळेपूर्वीच पूर्ण केला वेतन करार

## औद्योगिक इतिहासात नवा मापदंड प्रस्थापित, कामगार संघटनांनी केले स्वागत




**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

किर्लोस्कर समूहाच्या प्रमुख कंपनीपैकी एक असलेल्या किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड या खडकी येथील कंपनीने आपला अकरावा वेतनकरार नुकताच यशस्वीरीत्या पूर्ण केला. तो दिलेल्या वेळेपूर्वीच संपन्न झाल्याने औद्योगिक इतिहासात नवा मापदंड प्रस्थापित झाला आहे. ही महत्त्वाची घटना किर्लोस्कर ऑईल इंजिन्स यांच्या कामगार कल्याण, औद्योगिक सौहार्द आणि शाश्वत विकासाच्या प्रति बांधील असल्याचे प्रतीक आहे. वेतन करार सोहळ्यास कंपनीचे अध्यक्ष अतुल किर्लोस्कर, व्यवस्थापकीय संचालक गौरी किर्लोस्कर, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल सहाय, मुख्य मानव संसाधन अधिकारी जॉर्ज वर्गीस, मुख्य वित्तीय अधिकारी सचिन केजरीवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी (संचालन) मकरंद जोशी, बीटूबी विभागाचे मुख्य मानव संसाधन अधिकारी अमरजित सिंग, उत्पादन विभागातील मानव संसाधन विभाग प्रमुख वीरेंद्र गायकवाड, कारखाना व्यवस्थापक मिलिंद बोटे आणि मानव संसाधन विभाग व्यवस्थापक मधुकर गवस यांच्यासह वरिष्ठ व्यवस्थापनातील प्रमुख सदस्य उपस्थित होते. कामगार संघटनेच्या वतीने अध्यक्ष संजीव गायकवाड, उपाध्यक्ष राजेंद्र येडे, सचिव उल्हास खुटवड आणि कोषाध्यक्ष विकास कोरे यांनी प्रतिनिधित्व केले. हा करार कंपनी व्यवस्थापन आणि कामगार यांच्यातील परस्पर विश्वास, सहकार्य आणि सामाजिक मूल्यांचे प्रतीक आहे. वेतन करार वेळेअगोदर आणि प्रगतिशीलपणे पूर्ण करण्याच्या कंपनीच्या सातत्यपूर्ण इतिहासाचे द्योतक म्हणून २०११ मध्ये किर्लोस्कर ऑईल इंजिन्सचे झालेले वेतन करार लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंदवले गेले आहेत.

**कोणत्याही आस्थापनात वेतन करार करणे हे अत्यंत किचकट आणि वेळखाऊ काम असते. कामगारांची सर्व शक्ती त्यामध्ये खर्च होत असते. त्याचा परिणाम उत्पादनांवर होत असतो. पण किर्लोस्कर कंपनीने निर्धारित वेळेपूर्वीच वेतनकरार केल्यामुळे या ठिकाणी कामगारांची शक्ती उत्पादन प्रकियेत लागेल परिणामी औद्योगिक शांतता कायम राहून उत्पादनात वाढ होईल. यामुळे कामगार आणि मालक या दोघांचाही फायदा होणार आहे.**



**किर्लोस्कर कंपनीने नवी वाट निर्माण केली आहे. त्याचे अनुकरण सर्वांनी करावे.**

**- कॉ.प्रा.डॉ. महेबुब सय्यद.**
जिल्हाध्यक्ष, सिटु कामगार संघटना

# सिस्टीमने घडवलेले फूटसोल्जर्स
## ही तीच लोक आहेत



संजीव चांदोरकर
**अर्थवार्ता**

खरेतर, रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे, कोणत्याही कर्ज देणाऱ्या बँक, कंपन्यांनी अन्सेक्युअर्ड कर्जे देतांना गरीब कर्जदाराची परतफेड क्षमता तपासूनच कर्जे दिली पाहिजेत. पण मायक्रो फायनान्स कंपन्या स्वतःचा धंदा, शेयर प्राईस वाढवण्यासाठी गरीब स्त्रियांना भरमसाठ कर्जे वाटत आहेत. गरिबांची औकात नाही की ते हात पिरगळून कर्जे हिसकावून घेतील. न झेपणारी कर्जे डोक्यावर थापल्यामुळे गरीब कर्जदार स्त्रियांना वेळेवर परतफेड जमत नाही. वसुली एजंट धाकधपटशा दाखवतात. त्रास देतात. त्यातून असंतोष तयार होतो. मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या विरुद्ध मोर्चे निघतात. मग हेच लोक ''गरिबांना अक्कल नाही का ? गरिबांना कर्जाची हाव सुटली आहे. स्वतःच्या औकातीत राहावं माणसाने'' असे म्हणतात. ही तीच लोक आहेत... स्विगी, झोमॅटोच्या डिलिव्हरी बॉईजला, गिग वर्कर्सना १० मिनिटात डिलिव्हरी करायला लावते. त्यातून त्यांना कशा धापा टाकाव्या लागतात. ट्राफिकमध्ये जीव धोक्यात घालावा लागतो, असे सांगितले की म्हणतात, ''स्विगी, झोमॅटो त्या डिलिव्हरी बॉईजना हळदी कुंकू घेऊन घरी निमंत्रण द्यायला गेले नव्हते, नसेल करायची नोकरी तर सोडा झोमॅटो आणि करा दुसरी नोकरी.'' ही तीच लोक आहेत... महागाईत चार पैसे मिळवण्याच्या मोहाने वित्त निरक्षर गुंतवणूकदार काहीही कळत नसताना एका बाजूला शेयरमार्केट तर दुसऱ्या बाजूला टोरेंस सारखी कंपन्यात आपल्या कष्टाने मिळवलेल्या बचती घालून नुकसान करून घेतात. त्यांना कळत नाही तर सार्वजनिक बँकेत मुदत ठेव का नाही काढत, म्हणतात. आर्थिकदृष्ट्या मागास भागातील तरुण सैन्यात जातात. रशिया, इस्रायलमध्ये युद्ध आघाडीवर जातात म्हटल्यावर; जे सैन्यात जातात, जे रशिया, इस्रायलला जातात ते स्वतः जायचा निर्णय घेतात, सरकार कोणावर, कधीच कंपल्शन करत नाही, म्हणतात.पोटासाठी, पोटच्या पोरांना वाढवण्यासाठी नाईलाजाने शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांना दुसऱ्या नोकऱ्या करण्यात रस नसतो म्हणतात. शिकाऱ्याने खणलेल्या खड्ड्यात पडणाऱ्या सावजाला अक्कल नसते म्हणून हसतात. ही तीच लोक आहेत... सगळ्या क्षेत्राकडे मार्केट, मागणी पुरवठा या एकाच भिंगातून बघतात. वस्तुमाल आणि जितीजागती माणसे त्यांना एकच वाटतात. समाज, राष्ट्र, अर्थव्यवस्था सुट्या सुट्या व्यक्तींनी बनलेली असतात. प्रत्येकाला आपले श्रम, बुद्धी, शरीर, बचती कोठेही, कोणत्याही किमतीला विकायचे स्वातंत्र्य आहे, असे आपल्याला सांगतात. समाज, राष्ट्, अर्थव्यवस्थेतील अदृश्य सत्तासंबंध, पॉवर इक्वेशनस ते सांगत नाहीत. सत्ताधारी वर्गातील व्यक्ती असे काही बोलल्या तर एक वेळ समजू शकते. पण लक्षात घ्यायचा भाग हा की, या व्यक्ती त्याच समाज अर्थघटकातून येत असतात, ज्या समाज अर्थघटकातून वर वर्णन केलेल्या सापळ्यात अडकलेल्या व्यक्ती आलेल्या असतात. ते या सिस्टीमने घडवलेले फूट सोल्जर्स आहेत. त्यांना कन्व्हिन्स करण्याच्या फंदात पडू नका.




# आनंद निर्देशांकात आग्नेय आशियात व्हिएतनाम दुसऱ्या क्रमांकावर

**हनोई । प्रभाकर ढगे**



अलिकडच्या वर्षांत व्हिएतनामच्या स्थिर प्रगतीमुळे त्याचे स्थान लक्षणीयरीत्या सुधारले आहे, २०२१ मध्ये ७७ व्या स्थानावरून २०२२ मध्ये ६५ व्या स्थानावर आणि गेल्या वर्षी ५४ व्या स्थानावर आहे. देश आता आग्नेय आशियात दुसऱ्या स्थानावर आहे, सिंगापूर हा आग्नेय आशियातील पहिला आनंदी देश ठरला आहे. २०२५ च्या जागतिक आनंद अहवालात व्हिएतनाम ४६ व्या स्थानावर पोहोचला आहे, २०२३ च्या क्रमवारीपेक्षा आठ स्थानांनी पुढे. कम्युनिस्ट राजवट असलेल्या व्हिएतनामची अवघ्या काही काळातील वेगाने प्रगती करणारा आशियाई देश बनला आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातील वेलबीइंग रिसर्च सेंटरने २० मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालात नागरिकांच्या स्वतःच्या कल्याणाच्या आधारे १४३ देश आणि प्रदेशांचा क्रमांक लागतो. अलिकडच्या वर्षांत व्हिएतनामच्या स्थिर प्रगतीमुळे त्याचे स्थान लक्षणीयरीत्या सुधारले आहे, २०२१ मध्ये ७७ व्या स्थानावरून २०२२ मध्ये ६५ व्या स्थानावर आणि गेल्या वर्षी ५४ व्या स्थानावर आहे. हा देश आता आग्नेय आशियात सिंगापूरनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. याविषयी माहिती देताना हनोई शहरातील पर्यटन व्यावसायिक लियाम टिंग दैनिक रयत समाचारशी बोलताना म्हणाला, सततच्या युध्दांनी पोळून निघालेला व्हिएतनाम आशियातील इतर देशांच्या तुलनेत खूपच मागे होता. पण व्हिएतनामी माणसांनी प्रचंड कष्ट आणि देशप्रेमाच्या जोरावर आजची प्रगती केली आहे. सलग आठव्या वर्षी, फिनलंडला जगातील सर्वात आनंदी देश म्हणून घोषित करण्यात आले आहे, त्यानंतर डेन्मार्क, आइसलँड आणि स्वीडन आहेत. दरम्यान, कोस्टा रिका आणि मेक्सिको यांनी प्रथमच अनुक्रमे सहाव्या आणि दहाव्या क्रमांकावर, पहिल्या दहामध्ये प्रवेश केला आहे. तथापि, अमेरिका २४ व्या स्थानावर घसरला आहे, जो त्याचे विक्रमी सर्वात कमी स्थान आहे. रँकिंगच्या खालच्या टोकावर, अफगाणिस्तान तळाशी आहे, त्यानंतर सिएरा लिओन आणि लेबनॉन आहेत. जागतिक आनंद अहवाल गॅलप आणि संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास समाधान नेटवर्कच्या सहकार्याने तयार केला आहे. सामाजिक आधार, आयुर्मान, आर्थिक स्थिरता आणि समुदायांमधील दयाळूपणाची पातळी यासारख्या घटकांवर आधारित आहे.

# उद्योगी दृष्टिकोनाला व्यावसायिकतेची जोड देणारा उद्योगीनामा- दीपक लांडगे

## सचीन चोभे यांच्या ग्रंथाचे सकाळ प्रदर्शनात प्रकाशन

**अहमदनगर । प्रतिनिधी**



टपरी, वडापावची गाडी किंवा एखादी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी स्थापन करूनही व्यवसाय करता येतो. त्यासाठी काही कौशल्ये आणि मुख्य म्हणजे सकारात्मक विचार ठेऊन धडपड करणे आवश्यक असते. उद्योगी माणूसच काहीतरी उद्योग करू शकतो. असाच विचार मांडताना आपल्यामधील उद्योगी दृष्टिकोनाला व्यावसायिकतेची जोड देण्यासाठीचे मार्गदर्शन करण्याचे काम उद्योगीनामा या पुस्तकातून केलेले आहे, असे मत वाघेश्वरी डेअरीचे संस्थापक-संचालक उद्योजक दीपक लांडगे यांनी व्यक्त केले. देवग्रो कंपनीचे संचालक आणि लेखक सचिन मोहन चोभे यांनी लिहिलेल्या उद्योगीनामा या व्यावसायिक मार्गदर्शन पुस्तकाचे प्रकाशन रविवारी ता.२४ मार्च रोजी सावेडी येथील जॉगिंगट्रॅकवरील सकाळ पुस्तक प्रदर्शनात झाले. त्यावेळी उद्योजक लांडगे यांच्यासह सीए राजेंद्र काळे, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पाटील, शिवम कॉम्प्युटरचे संचालक संकेत पिसे, लोकरंगचे संचालक महादेव गवळी, निवेदक उद्धव काळापहाड, अमोल बागूल, नीलेश दिवटे, कृषीरंग प्रकाशनच्या संचालिका माधुरी चोभे, सचिन आठरे पाटील, संतोष बारस्कर, सुनील झगडे, मार्या थोरात, पत्रकार अशोकराजे निंबाळकर आदी उपस्थित होते. उद्योजक दीपक लांडगे यांनी पुस्तकासह एकूण व्यावसायिक मार्गदर्शन करताना सांगितले, उद्योजक व व्यावसायिक यांनी सतत सजग राहावे लागते. रिस्क मॅनेजमेंट आणि छोट्यापासून सुरुवात करून मोठ्या व्यवसायात रूपांतर करण्याचा मूलमंत्र सांगण्याचा चांगला प्रयत्न या पुस्तकातून केलेल्या आहे.

तर, सीए राजेंद्र काळे म्हणाले, व्यवसाय कसा करावा आणि कोणी सांगून होत नसतो. त्यासाठी आपल्यामध्ये असलेले गुण व कौशल्य यासह आत्मिक उर्मी जास्त महत्वाची असते. ज्ञानाला कौशल्याची जोड देऊनच यश मिळू शकते. त्यासाठी वाचन, चिंतन आणि मनन याची आवश्यकता आहे. तोच विचार उद्योगीनामा या पुस्तकातून दिलेला आहे. नव्याने उद्योग-व्यवसायात येऊ इच्छिणाऱ्या सर्वांसाठी हे एक महत्वाचे पुस्तक आहे. लेखकांनी खूप काळजीपूर्वक सर्व छोट्या-मोठ्या मुद्द्यांना स्पर्श करतानाच अनुभवातून आलेले शहाणपण या पुस्तकात शब्दबद्ध केलेले आहे. लेखक सचिन मोहन चोभे यांनी पुस्तकाबद्दल माहिती देताना प्रास्ताविकात सांगितले.

वीस वर्षांत घेतलेले उद्योगी आणि निरुद्योगी अनुभव व निर्णय यामुळे मी एक व्यावसायिक म्हणून घडत गेलो. अजूनही खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. मात्र, आपल्याला आलेले अनुभव आणि झालेल्या चुका यातून इतर वाचकांना बोध व्हावा. नव्याने व्यवसायात येऊ इच्छिणाऱ्या युवक-युवती आणि मुख्य म्हणजे त्यांच्या पालकांनी अशा उद्योगी व धडपड्या पाल्यांना काय आणि कशी मदत करावी याबद्दलचे मुक्तचिंतन उद्योगीनामा पुस्तकातून मांडलेले आहे. त्यामुळे मराठी वाचकांना हे व्यावसायिक मार्गदर्शन करणारे पुस्तक नक्कीच आवडेल याचा विश्वास वाटतो. लवकरच इंग्रजी आणि हिन्दी भाषेतही या पुस्तकाच्या आवृत्ती येणार आहेत.




# महाबोधी विहारचे नियंत्रण ताब्यात देण्याची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

बिहार मधील महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी शहरातून मंगळवारी (ता.२५ मार्च) रणरणत्या उन्हातून दुपारी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात बौध्द समाजातील बांधवांसह महिला देखील मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या मोर्चाच्या माध्यमातून केंद्र सरकारला बौध्द समाजाच्या वतीने भारत बंदचा इशारा देण्यात आला आहे. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन या मोर्चाचे प्रारंभ करण्यात आले. जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज व माळीवाडा येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहाराने अभिवादन करुन मोर्चाचे पुढे मार्गक्रमण झाले. बौद्ध धर्माची अस्मिता असलेल्या महाबौध्दि बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात मिळण्यासाठी व बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करण्यासाठी समाजबांधवांनी जोरदार घोषणाबाजी केली.

मोर्चात बौध्द धर्माचे प्रतिक असलेले पंचशील ध्वजासह महाबौध्दि बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याचे फलक हातात घेण्यात आले होते. मोर्चातील रथात भगवान बुध्द व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासह भन्ते व भिक्खू उपस्थित होते. माळीवाडा मार्गे पंचपीर चावडी, माणिक चौक, कापड बाजार, चितळे रोड व दिल्ली गेट येथून सिध्दीबाग येथील बुद्धविहारात या मोर्चाचा समारोप सभेतून झाला. यावेळी विविध आंबेडकरी चळवळीतील पक्ष, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते देखील उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपल्या भाषणातून बिहार मधील महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी लावून धरली. सम्राट अशोक यांनी इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले. तथागत बुद्धाला ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे, तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात; मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठी १९९२ पासून आंदोलन होत आहेत. तरी सुद्धा महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा बदलण्यात आला नाही. त्यामुळे पाच हिंदू धर्मीय यांचे प्राबल्य असल्याने बौध्द गया येथील महाविहारात पुजा आणि कर्मकांड सुरु आहे. मात्र बौद्ध धर्म गुरुंना त्यांच्या विधीप्रमाणे पूजेचा अधिकार मिळत नाही.

ज्या रूढी परंपरांना तथागत गौतम बुद्ध यांनी नाकारले तेच कर्मकांड येथे सुरू असल्याचा आरोप करण्यात आला . भारतीय राज्यघटनेचे कलम १३ नुसार घटना लागू होण्यापूर्वी केलेले सर्व कायदे आणि नियम निरस्त केले आहेत. मात्र तरी देखील देशात १९४९ चा नियमबाह्य कायदा लावून बौध्द समूहाचे धार्मिक अधिकार काढून घेण्यात आले असल्याचे बौध्द समाजाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) हे पवित्र बौद्ध धर्मस्थळ असून, बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करावा, बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन बौद्धांच्या ताब्यात द्यावे, जागतिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष विकास निधी आणि सुविधा तात्काळ देण्यात याव्या, केंद्र सरकार आणि बिहार सरकारने आपले विशेष अधिकार वापरून १९४९ चा कायदा दुरुस्त करण्याचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली आहे.

अभिशिल्प
DESIGN STUDIO
Architectural Planning | Interior Designing | Landscape Planning | Civil Construction
Ar. Durga Shilpa Abhijit Wagh
9552340001
8275201476
abhishilp_design_studio
abhishipdesignstudio@gmail.com
5, Raigad, Swati Housing Colony, Burudgaon Road, Ahmednagar 414001 Maharashtra.



# स्वच्छ, सुंदर व हरित प्रभागाचे स्वप्न पूर्ण करणार– अविनाश घुले

## रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक ११ मध्ये नागरिकांच्या सहकार्यामुळे विकासाच्या योजना यशस्वीपणे राबविल्या आहेत. सतत जनतेच्या संपर्कात असल्यामुळे दैनंदिन मूलभूत प्रश्न तातडीने सोडविले जात असतात, त्यामुळे ऋणानुबंध निर्माण झाले आहे.

***कानडे मळ्यातील माउंट लिटरा झी स्कूल कडे जाणारा रस्ता असून या ठिकाणी विद्यार्थी पालक वर्ग स्कूल बस ड्रायव्हर मोठ्या संख्येने येत असतात तसेच कानडे मळ्यातील नागरिकांच्या दळणवळणासाठी हा मुख्य रस्ता असून त्याचे काम स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले यांनी मंजूर करून दिला आहे. तसेच लवकरच रस्त्याचे काम पूर्ण होऊन विद्यार्थी व नागरिकांसाठी दळणवळणासाठी खुला केला जाणार आहे अशी माहिती रामदास कानडे यांनी दिली.***


नियोजनबद्ध व कायमस्वरूपी विकासाचे कामे मार्गी लागत आहे. जमिनी अंतर्गत ड्रेनेज लाईन पिण्याच्या पाण्याच्या लाईनची कामे मार्गी लागल्यानंतर रस्त्यांची कामे पूर्ण केली जात असल्यामुळे ती कामे पुन्हा-पुन्हा करण्याची वेळ आपल्यावर येत नाही. आमदार संग्राम जगताप व महापालिकेच्या माध्यमातून प्रभागातील बहुतांश कामे पूर्ण झाली आहे.

स्वच्छ सुंदर व हरित प्रभागाचे पाहिलेले स्वप्न पूर्ण करणार असल्याचे प्रतिपादन स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले यांनी केले. कानडे मळा येथे मा.सभापती अविनाश घुले यांच्या प्रयत्नातून रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन संपन्न झाले. यावेळी रामदास कानडे, मिलिंद कानडे, सोमनाथ हजारे, पोपट रासकर, कैलास कानडे, ज्ञानदेव मोरे, अंबादास लोंढे, बाबासाहेब सांगळे, नितीन डाडर अदिसह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अहमदनगर न्याय व्यवस्थेला २०० वर्षे पूर्ण

# सेंट्रल ॲडव्होकेट् बार असोसिएशनच्या वतीने व्याख्यानमालेसह स्मरणिका प्रकाशन

**अहमदनगर । प्रतिनिधी**



अहमदनगर जिल्हा न्याय व्यवस्थेला २०० वर्षे पुर्ण झाल्याबद्दल अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट् बार असोसिएशन यांनी व्याख्यानमाला, आमंत्रित मान्यवरांचे सत्कार व स्मरणिकेचे प्रकाशन असे विविध कार्यक्रम आयोजित केले आहे. दौंड रोडवरील सॉलीटीयर, बडीसाजन कार्यालय येथे ता.६ एप्रिल रोजी सकाळी १०:३० वा. कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला सुप्रिम कोर्ट ऑफ इंडियाचे ज्येष्ठ (कॉलेजीयम मेंबर) न्यायमुर्ती अभय ओक यांचे भारतीय राज्यघटना व पर्यावरण या विषयावर तसेच दुसरे सुप्रिम कोर्टाचे न्यायमुर्ती प्रसन्न वराळे हे भारतीय राज्यघटना व ७५ वर्षे या विषयावर व्याख्यान होणार आहे. दोनही न्यायमुर्ती हे विषयांची संपुर्ण मांडणी मराठी भाषेत करणार आहेत. या कार्यक्रमास याच जिल्ह्यातील उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय, विविध न्यायालयात कार्यरत असलेल्या जिल्ह्यातील व शहरातील न्यायाधिशांचा सत्कार समारंभ आयोजित केला आहे. यातील प्रमुख सत्कार न्यायमुर्ती उर्मीला जी फलके, न्यायमुर्ती बी.जी. कोळसे पाटील, न्यायमुर्ती व्ही.एन. दाभोळकर, न्यायमुर्ती एस.बी. देशमुख, न्यायमुर्ती साधना जाधव, न्यायमुर्ती श्रीमती फणसाळकर, न्यायमुर्ती विनय जोशी, न्यायमुर्ती एस.जी. शिवलीकर आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे पालक न्यायमुर्ती श्रीमती विभा कंकणवाडी, न्यायमुर्ती संतोष चपळगावकर व जिल्हा न्यायालयाचे प्रधान जिल्हा न्यायाधिश श्रीमती अंजु शेंडे यांची प्रमुख उपस्थिती रहाणार आहे.अहमदनगर जिल्ह्यातील जी वकिल मंडळी बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र गोवा या संस्थेत पदाधिकारीपद भुषवले त्यापैकी प्रमुख ॲड. बी.जी. कोळसे पाटील, ॲड. आर.बी. पुलाटे, ॲड. विश्वासराव आठरे पाटील, ॲड. श्रीमती दिपलक्ष्मी म्हसे पाटील, ॲड. अशोक पाटील, ॲड. दुबे पाटील, ॲड. डॉ. उदय वारुंजीकर यांचाही यथोचित गौरव करण्यात येणार आहे.कार्यक्रमास उपस्थित राहुन योग्य ते सहकार्य करावे, असे आवाहन सेंट्रल ॲडव्होकेट् बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी, कार्यकारी समिती सदस्य ॲड. सुभाष काकडे, ॲड. विश्वासराव आठरे पाटील, ॲड. जयवंत भापकर, ॲड. किशोर देशपांडे तसेच सर्व कार्यकारणी सदस्य यांनी केले.

# एफपीव्ही विषाणूमुळे शेकडो मांजरांचा मृत्यू



**रायचूर । प्रतिनिधी**

कर्नाटक राज्यामधे मांजरांमध्ये एफपीव्ही (Feline Panleukopenia Virus) नावाच्या एका जीवघेण्या विषाणूचा कहर झाला आहे. रायचूर जिल्ह्यात एफपीव्ही या विषाणूमुळे आतापर्यंत शेकडो मांजरांचा मृत्यू झाल्याची माहिती आली. एफपीव्ही हा अत्यंत संसर्गजन्य विषाणू वेगाने पसरत आहे. या आजारावर कोणताही उपचार नाही. माणसांना अगर अन्य पाळीव प्राण्यांना याचा अजिबात धोका नाही.

# मन:शांती हरवत चालली असताना ध्यान शिबिर आत्मिक शोधाकडे घेऊन जाणारे– पुष्पा बोरुडे

## आयुर्वेद व्यासपीठ धन्वंतरी उद्यान सभागृहात आयोजित ध्यान कार्यक्रम

**अहमदनगर । सुरेश मैड**

दैनंदिन जीवनात येणाऱ्या ताण-तणावापासून मुक्त होऊन स्वतःच्या हृदयाशी संवाद साधून एक आगळावेगळा एकात्म होण्याचा अनुभव उपस्थितांनी घेतला. हार्टफुलनेस अहिल्यानगर केंद्र आणि भारत सरकार सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीने एकात्म अभियानांतर्गत धर्माधिकारी मळा परिसरातील आयुर्वेद व्यासपीठाच्या धन्वंतरी उद्यान सभागृहात आयोजित ध्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



याप्रसंगी महिला बालकल्याण समितीच्या माजी नगरसेविका पुष्पा बोरुडे, वंदना ताठे, रवींद्र बारस्कर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गायक पवन नाईक, हार्टफुलनेस संस्थेचे प्रशिक्षक डॉ. दत्तात्रेय गिरगे, सुनील बल्लाळ, वैद्य मंदार भणगे, डॉ.सौ. अर्चना गिरगे, विष्णू पालीवाल, संयोजक महेश लेले उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्या पुष्पा बोरुडे यांनी बोलताना आपल्या धावपळीच्या युगात मन:शांती हरवत चालली असताना आज आयोजित हे ध्यान शिबिर स्वतःचा आत्मिक शोधाकडे घेऊन जाणारे असल्याचे सांगितले.रवींद्र बारस्कर यांनी मनोगतात शारीरिक सुदृढते बरोबरच मानसिक शांतीकडे प्रयत्नपूर्वक लक्ष देणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने हार्टफुलनेसने आयोजित केलेले शिबिर महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

गायक पवन नाईक यांनी बोलताना स्वतःचा आत्मिक शोध घेऊन अंतरात्म्याशी संवाद साधण्याची कला ही ध्यानातून येते. अनेक संतांनी आपल्याला परमेश्वराजवळ पोहोचण्यासाठी हा मार्ग सांगितला. आजच्या या शिबिरातून स्वतः चा शोध घेण्याचा चैतन्यमय प्रवास सुरू झाला असल्याचे सांगितले.

रयत समाचार **Classified** छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
– संपर्क –
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर – ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल – rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१– माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२– वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# भगवानगडाचे लाडके शिष्य ह.भ.प. स्वप्निल महाराज ठाकरे शास्त्री यांना डॉक्टरेट प्रदान

## श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीच्या आधारे त्यातील व्यक्तिमत्त्वांचे विश्लेषणात्मक अध्ययन विषयात संशोधन



**राजेंद्र देवढे । पाथर्डी**

ज्ञानेश्वरी विद्यापीठ, श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यार्थी ह.भ.प.स्वप्निल महाराज ठाकरे शास्त्री यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरची शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही बहुमानाची पदवी आज जाहीर झाली. ही पदवी मिळवल्याबद्दल स्वप्निल महाराज ठाकरे शास्त्री यांचे, ह.भ.प. श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबा, श्री क्षेत्र भगवानगडाचे प्रधानाचार्य ह.भ.प. नारायण महाराज शास्त्री, सिद्धेश्वर संस्थान शिरूर कासारचे महंत ह.भ.प. स्वामी विवेकानंदजी महाराज शास्त्री, राजा हरिश्चंद्र संस्थानचे महंत ह.भ.प. भगवान महाराज राजपूत इत्यादींसह अनेक संत महंतांनी कौतुक केले आहे.

ठाकरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रा. डॉ. क्रांती व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीच्या आधारे त्यातील व्यक्तिमत्त्वांचे विश्लेषणात्मक अध्ययन हा अभ्यास विषय घेऊन आपला शोध प्रबंध विद्यापीठास सादर केला होता.

आज त्यांची मौखिक परीक्षा ऑनलाईन पद्धतीने पार पडली. आधुनिक काळातील जगात मनुष्याचे राहणीमान जरी बदलत चालले असले तरी त्यांच्या जीवनावर परंपरागत पद्धतीने प्रभाव टाकणारी व्यक्तिमत्त्वे श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरी ग्रंथातील व्यक्तीरेखांमध्ये आढळतात. श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीतील व्यक्तीमत्वे ही मानवी जीवनाचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वातील प्रत्येक कृतीतून प्रेम, कर्तव्य सामाजिक बांधिलकी, मुत्सद्दीपणा, शौर्य, त्याग, विवेक, गुणग्राहकता, धर्मनिष्ठा, सहनशक्ती, आदरभाव, उत्साह, आनंद आदी गुणवैशिष्ट्ये दिसून आली. त्यामुळे मानवाच्या राहणीमानात दिवसेंदिवस फरक पडत असला तरी समस्या मात्र त्याच असल्याने भूत, वर्तमान व भविष्यातही श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वातील वरील गुणवैशिष्ट्यांचे पैलू जीवन जगताना उपयोगी पडत राहतात. श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या दोन्ही मूळ संस्कृत व मराठी भाषेतील ग्रंथांमध्ये आलेल्या व्यक्तिमत्वांचा विविध पैलूंच्या आधारे अभ्यास करणे तसे अवघड काम आहे.

परंतु या दोन भिन्न भाषांचा संगम साधून डॉ. स्वप्निल महाराज ठाकरे शास्त्री यांनी एक नवीन मांडणी सिद्ध केली आहे. जी आजच्या आभासी काळातही पथदर्शी ठरते. लवकरच ती ग्रंथ रूपाने आपल्यासमोर येईल. आपले श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या शिरपेचात वाढत चाललेल्या मानाच्या तुऱ्यांमुळे भगवानगडाच्या भाविकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

या यशाचे श्रेय त्यांनी श्री क्षेत्रभगवानगडाचेमठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री व आपल्या आई वडिलांसह या प्रवासात कळत नकळत साथ देणाऱ्या सर्वांना दिले आहे. ज्ञानेश्वरी विद्यापीठ श्री क्षेत्र भगवानगडाचेच विद्यार्थी असलेले ह.भ.प. सुधाकर महाराज सानप शास्त्री व महंत ह.भ.प. गणेश महाराज बडे शास्त्री यांनी देखील यापूर्वीच विद्यावाचस्पती पदवी संपादन केलेली आहे.



## जि.म.वि.प्र.शिक्षण संस्थेचे दरे, आठरे, वाघ यांचा शनिदरबारी सन्मान

**नेवासा । विजय खंडागळे**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ आदींनी ता.२४ रोजी शनिशिंगणापूर येथे शनिदर्शन घेतले.

त्यांचे स्वागत माऊली ऑटोमोबाईलचे संचालक तथा मुळा बँक संचालक रामभाऊ कराळे यांनी केले.

यावेळी पत्रकार विजय खंडागळे, सोनवणे, अविनाश कराळे, किरण दहातोंडे आदी उपस्थित होते.

रामचंद्र दरे यांनी देवस्थान राबवित असलेल्या विकासकामांचे कौतुक केले.

# किरण शिंदे उत्कृष्ट मराठी अध्यापक कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था टाकळीभान तालुका श्रीरामपूर यांचे वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापक कार्य गौरव पुरस्कार श्रीमंत राजमाता विजया राजे शिंदे कन्या विद्यालयात उपशिक्षक तथा गुरुकुलप्रमुख म्हणून कार्यरत असणारे, मराठी विषयाचे अध्यापक व स्पर्धा परीक्षा तज्ज्ञ मार्गदर्शक किरण पवित्रा देविदास शिंदे यांना प्रदान करण्यात आला. रविवार ता. २३ मार्च २०२५ रोजी ज्ञानज्योती बहुउद्देशिय संस्था यांच्याकडून राज्यस्तरीय तिसरे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन रूक्मिणी माधव मंगल कार्यालय टाकळीभान या ठिकाणी करण्यात होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध भाषातज्ज्ञ आणि समीक्षक प्राध्यापक डॉ. केशव देशमुख हे होते तर कुसुमाग्रज यांच्या मानसकन्या रेखा भंडारे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला . किरण शिंदे हे मराठी विषयाचे अध्यापक असून मराठी विषयातील, ग्रामीण मराठी साहित्यात पी. एच. डी. करीत आहेत. आज अखेर त्यांनी मराठी दलित कादंबरी, आदिवासी कथा, व ग्रामीण साहित्य लोकजीवन या विषयावर संशोधन कार्य केले आहे. शिक्षण क्षेत्रातील मराठी भाषेची सेवा केलेल्या राज्यभरातील मान्यवरांचा सदर प्रसंगी गौरव करण्यात आला . या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी पोपटराव पटारे, आमदार हेमंत ओगले , सभापती वंदना मुरकुटे , प्राध्यापक डॉक्टर बापूराव उपाध्ये , प्राध्यापक डॉ. संदीप सांगळे व ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत उपस्थित होते . त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.




# छबुबाई देवढे यांचे निधन

**राजेंद्र देवढे । पाथर्डी**

तालुक्यातील मोहोज देवढे येथील रहिवासी छबुबाई भानुदास देवढे यांचे रविवार ता. २३ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

मृत्युसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते. मोहोज देवढे गावाच्या जुन्या काळातील अनेक घटनांच्या त्या साक्षीदार होत्या. त्यांचे पती दिवंगत भानुदास देवढे यांच्या समवेत उंबरठ्यावरचे शीगभरले माप ओलांडून गृहप्रवेश केल्यानंतर गृहस्थाश्रमात योगदान देताना त्यांनी मोठ्या सचोटीने प्रपंच केला.



त्यांच्या पाठीशी शेषनारायण, रामनाथ व भगवान या सुपुत्रांसह नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे गावातील जुन्या काळातील इतिहासाचा एक प्रत्यक्षदर्शी साक्षीदार गावाने गमावला आहे.

रविवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील स्त्री-पुरुष ग्रामस्थांसह नातेवाईक व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## प्राचार्य हरिभाऊ जावळे उत्कृष्ट शिक्षक व उत्तम प्रशासक - रा. ह. दरे

### प्राचार्य जावळे सेवापुर्ती गौरव समारंभ संपन्न

**नेवासा । प्रा.रावसाहेब राशिनकर**

तालुक्यातील चांदा येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयील प्राचार्य हरीभाऊ कृष्णाजी जावळे यांचा सेवापुर्ती गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य जावळे हे उत्कृष्ठ शिक्षक व उत्तम प्रशासक असून त्यांनी संस्थेत दिलेले योगदान उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन संस्थाध्यक्ष रामचंद्र दरे यांनी अध्यक्षीय भाषणात बोलताना केले. प्राचार्य जावळे हे अभ्यासू, कामसू व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहेत, अशा शब्दांत संस्था सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी प्राचार्यांच्या कार्याचा गौरव केला. संस्थेच्या यशस्वीतेमध्ये सर्व स्थानिक पातळीवर काम करणारे, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा मोलाचा वाटा आहे, असेही ते म्हणाले. प्राचार्य जावळे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान मोलाचे असून विद्यार्थ्यांनी सरांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा हे गुण आत्मसात करावे, अशा शब्दांत संस्थेचे सहसचिव जयंत वाघ यांनी सरांचे कौतुक केले. प्राचार्य जावळे हे हाडाचे शिक्षक, उत्तम मार्गदर्शक व प्रशासक आहेत असे गौरवोद्गार ज्येष्ठ विश्वस्त जी.डी. खानदेशे यांनी काढले. विद्यार्थी व शिक्षकांनी परिस्थितीचे भांडवल न करता निष्ठेने व तत्परतेने काम करत राहावे असे प्राचार्य हरीभाऊ जावळे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले.

कार्यक्रमप्रसंगी संस्था खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, संस्था कार्यकारिणी सदस्य डॉ. दीपक शिंदे, नानासाहेब अंबाडे, नानासाहेब शिंदे, प्रा.अशोक चौधरी, विजयाताई अंबाडे, उपप्राचार्य रघुनाथ भोजने, पर्यवेक्षक अविनाश रामफळे, इफको कंपनी व्यवस्थापकीय संचालक ढेपे, कृषी अधिकारी कासार, उपाध्यक्ष बाबासाहेब जावळे, कस्तुरीताई राशिनकर, किरण जावळे, बंडू दहातोंडे, सर्व शाखा शाळांचे मुख्याध्यापक व प्राचार्य, शिक्षणप्रेमी नागरिक, आप्तेष्ट व मित्रपरिवार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विजयाताई अंबाडे, माजी संस्था निरीक्षक रंगनाथ भापकर, सरपंच कु. सुनंदाताई दहातोंडे, प्राचार्य विजयकुमार पोकळे, डॉ. दीपक शिंदे, प्राचार्य घिगे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कैलास दहातोंडे, उच्च माध्यमिक विभाग समन्वयक प्रा. भाऊसाहेब तांबे, प्रसिध्दी विभाग प्रमुख प्रा. रावसाहेब राशिनकर, सरांची कन्या ऋतुजा हरिभाऊ जावळे-नेव्हे, नात अरोही अनिल जावळे, शालेय विद्यार्थीनी ज्ञानदा चौधरी, दिपाली शिर्के, साक्षी अंबाडे, आदेश भगत यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक संदीप शेंडगे यांनी केले. प्रा.भाऊसाहेब तांबे व स्वाती दळवी यांनी सूत्रसंचालन तर ज्येष्ठ शिक्षक संजय ढेरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# एआय तंत्रज्ञान सर्वकाही शक्य करु शकते- डॉ. दिपक शिकारपुर

## संजीवनी तंत्रनिकेतनमध्ये राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धांचे उद्‌घाटन

**कोपरगांव । किसन पवार**

अलिकडच्या काही वर्षांमध्ये तंत्रज्ञानात झपाट्याने बदल होत आहे. यात आर्टीफिशियल इंटिलिजन्स (एआय) म्हणजेच कृत्रिम बुध्दीमत्तेची महत्वपुर्ण भुमिका आहे. एआयच्या मदतीने शैक्षणिक, औद्योगीक, कृषी , सामजिक, अशा अनेक क्षेत्रात भविष्यात क्रांती घडवुन आणण्याची क्षमता निर्माण झालेली आहे. शिक्षण ही सतत चालु राहणारी प्रक्रिया आहे, त्यासाठी वेळेचा भांडवल म्हणुन वापर करा व स्वतःला अद्ययावत ठेवा तरच आपण जीवनात यशस्वी होवु, असे प्रतिपादन जागतिक दर्जाचे आयटी इंजिनिअर, डिजिटल साक्षरता कार्यकर्ते व लेखक आणि करिअर सल्लागार डॉ. दिपक शिकारपुर यांनी केले. संजीवनी के.बी.पी. पॉलीटेक्निक आयोजीत, संजीवनी युनिव्हर्सिटी व रोटरी क्लब ऑफ कोपरगांव सेंट्रल प्रायोजीत राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धा 'संजीवनी टेक मंत्रा २०२५' च्या उद्घाटन प्रसंगी डॉ. शिकारपुर प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. याप्रसंगी मंचावर संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे, लघु उद्योग भारती नाशिकचे अध्यक्ष, उद्योजक व संजीवनीचे माजी विद्यार्थी निखिल




तापडीया, रोटरी क्लब ऑफ कोपरगांव सेंट्रलचे अध्यक्ष राकेश काले, संजीवनी युनिव्हर्सिटीचे व्हाईस चांसलर डॉ. ए. जी. ठाकुर, इंजिनिअरींग कॉलेजचे डायरेक्टर डॉ. एम. व्ही नागरहल्ली, पॉलीटेक्निकचे प्राचार्य प्रा. ए. आर. मिरीकर, संजीवनीचे माजी विद्यार्थी व उद्योजक कमलेश उशीर आणि सर्व विभाग प्रमुख व डीन्स व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी प्राचार्य मिरीकर यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून संस्थेच्या प्रगतीचा चढत्या कमानीचा आलेख मांडला तसेच एकुण स्पर्धे विषयी माहिती देवुन ११०० स्पर्धकांनी भाग घेतल्याचे सांगीतले. डॉ. ठाकुर यांनी संजीवनी विद्यापीठाची माहिती दिली. डॉ. शिकारपुर पुढे म्हणाले की विद्यार्थ्यानी उद्योगांना अपेक्षित कौशल्ये आत्मसात करण्यासाठी इंटरनेटचा सकारात्मक वापर करणे गरजेचे आहे. तसेच सॉफ्ट स्किल्स अवगत करणेकरीता विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा उपयोग करणे महत्वाचे ठरेल. परदेशात बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध असुन त्याकरीता परदेशी भाषा शिकणे आवश्यक आहे. दुसरे अतिथी तापडीया म्हणाले की तांत्रिक शिक्षण घेणारे विद्यार्थी भारताच्या सर्वांगीण विकासाचा कणा आहे. विद्यार्थ्यांनी तांत्रिक प्रकल्पाकडे बघण्याचा दृष्टिकोन उद्योजक बनण्यासाठीचा ठेवुन इतरांना रोजगार देण्याकरीता स्वतःचा व्यवसाय चालु करावा, असे आवाहन केले. अध्यक्षिय भाषणात अमित कोल्हे म्हणाले की बदलत्या काळाची गरज लक्षात घेता संजीवनी विद्यापीठात प्रकल्प आधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. आपणही त्या पध्दतीने पुढे गेल्यास अधिक तंत्रज्ञान अवगत होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतुन २०४७ साली भारत विकसीत भारत असेल. त्यासाठी तुम्ही खरे आधार आहात. मोठी स्वप्ने पहा. शिकत असताना शिकण्याकडेच लक्ष द्या, पुढील ४० वर्षे सुखाचे जातील. टेक मंत्राचे समन्वयक प्रा. एस. ए. पाटील यांनी आभार मानले.या स्पर्धा आयोजीत करण्याकरीता आयएसटीई व इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे सहकार्य लाभले. तसेच सर्व विभाग प्रमुख, डीन्स आणि टेकमंत्राचे सहसमन्वयक डॉ. एस.पी. तनपुरे व प्रा. व्ही. एस.धांडे यानी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष परीश्रम घेतले.

# भारत आनंदी का नाही?

२० मार्च हा दिवस जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक सर्व्हे केला जातो. संपत्ती, आरोग्या बरोबरच परस्परंवरील विश्वास, ऋणानुबंध, करुणा या निकषांच्या आधारावर हे सर्व्हेक्षण केले जाते. वरील निकषांचा विचार करून यावर्षीही या संस्थेने जगातील १४७ देशांचा सर्व्हे करून एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात या संस्थेने जगातील सर्वाधिक आनंदी देशांची यादी प्रसिद्ध केली. या यादीतील पहिल्या वीस देशांमध्ये युरोपातील देशांचे वर्चस्व आहे. गेल्या अनेक वर्षापासून युद्धाच्या आगीत होरपळणारा इस्राईल हा देश आनंदी देशांच्या यादीत आठव्या स्थानी आहे. सतत युद्धाच्या छायेत राहूनही इस्रायली नागरिक आनंदी आहेत. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग आठव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४७ देशांच्या यादीत भारत ११८ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, नेपाळ, आणि चीन हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, नेपाळ आणि चीन यासारख्या देशात सध्या मोठया प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत इतकेच काय तर युद्धग्रस्त युक्रेन आणि पॅलेस्टाईन हे देशही भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत. आनंदी देशांच्या यादीत युक्रेन १११ व्या क्रमांकावर आहे तर पॅलेस्टाईन १०८ व्या क्रमांकावर आहे. जगातील गरीब, मागास आणि युद्धाच्या छायेत असणाऱ्या देशातील लोक आनंदी असताना भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेचीच बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग आठव्यांदा आनंदी देशाच्या यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावांचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि समानता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे समानता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचे असले तरीही. फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारततही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**



# कुकडी पाणीप्रश्न मार्गी न लागल्यास आमरण उपोषण करणार- प्रशांत दरेकर

## कुकडीचे पाणी देण्यास कार्यकारी अभियंता अपयशी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यात कुकडीचे पाणी न मिळाल्यामुळे वंचित लाभधारक शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयासमोर काँग्रेसचे नेते घनश्याम अण्णा शेलार यांच्या नेतृत्वाखाली २४ मार्चपासून धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. रब्बी हंगामाचे दुसरे आवर्तन तबबल ३५ दिवस सुरू असताना पाणी उशाला मात्र कोरड घशाला अशी स्थिती श्रीगोंदा तालुक्यातील कुकडी लाभधारक शेतकऱ्यांची निर्माण झाली आहे. दरम्यान कुकडी कालव्याचे आवर्तन १६ फेब्रुवारी रोजी सुरू झालेले असताना श्रीगोंदा तालुक्याच्या हद्दीत १६ मार्चपासून पाणी देण्यास सुरुवात झाली. त्यामध्ये डी वाय १२; १३ आणि १४ तसेच चोराचीवाडी, लिंपणगाव,वेळू, आढळगाव इत्यादी वित्तरिकेंच्या लाभ क्षेत्रातील बहुतांशी शेतकऱ्यांच्या पिकाला पाणीच मिळाले नाही. मात्र चाऱ्या बंद झालेल्या आहेत. नेहमीप्रमाणे श्रीगोंदा तालुक्यातील पूर्व भागातील शेतकऱ्यांवर खूप मोठा अन्याय या आवर्तनाच्या निमित्ताने झालेला असल्याचे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत दरेकर यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांवर आरोप केला आहे. नेहमीप्रमाणे श्रीगोंदा तालुक्यातील पूर्व भागातील शेतकऱ्यांवरती खूप मोठा अन्याय या आवर्तनाच्या निमित्ताने झालेला आहे. वरील भागात देखील पाणी देत असताना शेतकऱ्यांच्या पिकाला पाणी देण्याऐवजी काल मर्यादेचे बंधन घालत एवढ्याच वेळात सिंचन आटोपले पाहिजे. अशा प्रकारची भूमिका घेऊन शेतकऱ्यांवरती अन्याय करण्याचा जलसंपदा विभागाकडून प्रयत्न झालेला आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांचे करोडो रुपयाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाल्याचा दावा तालुकाध्यक्ष दरेकर यांनी उपस्थित केला.

दरम्यान या आंदोलन स्थळी तहसीलदार डॉ. क्षितिजा वाघमारे व कुकडीचे कार्यकारी अभियंता घोरपडे यावेळी आंदोलन स्थळी उपस्थित होते. तहसीलदार डॉ. क्षितिजा वाघमारे यांनी कार्यकारी अभियंतांना शेतकऱ्यांच्या पाणी मागणीचा प्रस्ताव तात्काळ तयार करून डेडस्टॉक मधून पाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचना यावेळी कार्यकारी अभियंता यांना केल्या. तर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत दरेकर यांनी सात दिवसात आम्ही कार्यकारी अभियंत्यांच्या प्रस्तावाची वाट पाहणार आहोत. तोपर्यंत वंचित लाभधारक शेतकऱ्यांचे आमरण उपोषण ही कायम ठेवणार असल्याचे यावेळी सांगितले. दरेकर यांनी आणखी पुढे म्हटले आहे की, ज्या चाऱ्यांना पाणी मिळाले नाही, त्या वितरिकांचे पंचनामे करा मगच खरी परिस्थिती शेतकऱ्यांची दिसून येणार आहे. केवळ एका आवर्तनाअभावी शेतकऱ्यांचे कोट्यावधीचें नुकसान झाले. त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल देखील दरेकर यांनी केला आहे. श्रीगोंदे तालुक्यात कुकडीचे पाणी न मिळण्यामागे कार्यकारी अभियंताच जबाबदार असल्याचा आरोप देखील दरेकर यांनी केला. श्रीगोंदेकरांचे पाणी नेमके गेले कुठे? असा सवाल उपस्थित करत दरेकर यांनी आणखी पुढे म्हटले आहे की, सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून तालुक्यातील शेतकरी त्यांच्या विहिरीत बोरवेलला उपलब्ध असणारे पाणी शेतात उभ्या असणारे पिकांना देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करत असताना महावितरण कंपनीने देखील गलथान व अनागोंदी कारभार सुरू केला आहे. विजेची देखील अनियमिता दिसून येत आहे. वीज आली तर अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा व विजेचा लपंडाव यामुळे शेतकरी मेटाकुटला आल्याचे दरेकर यांनी यावेळी बोलताना सांगितले. या आंदोलन स्थळी कुकडी लाभ क्षेत्रातील वंचित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सिमेमॅटिक इतिहास घडताना: खेळीमेळीच्या मजेशीर कार्यक्रमात

# २६ नोव्हेंबरच्या ट्रेलर आणि पोस्टरचे अनावरण

**मुंबई । अशिष निनगुरकर**

२६ नोव्हेंबर या आगामी मराठी चित्रपटाचा ट्रेलर आणि पोस्टर लाँच हा केवळ एक लाँचिंग इव्हेंट नव्हता तर उपस्थित असलेल्या प्रत्येकासाठी ती एक संस्मरणीय संध्याकाळ ठरली. आपल्या काळातील सर्वात प्रासंगिक आणि महत्त्वाच्या चित्रपटांपैकी एक असलेल्या या चित्रपटाच्या ट्रेलर आणि पोस्टर लाँचला केवळ चित्रपटातील कलाकार आणि टीमनेच नव्हे तर सर्व क्षेत्रातील अनेक खास मान्यवरांनीही उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम खूप महत्वाचा आणि खास बनवला.हा चित्रपट सामान्य लोकांना त्यांच्या घटनात्मक हक्कांची जाणीव करून देण्याच्या विषयावर आधारित आहे. या चित्रपटात अनिकेत विश्वास राव, डॉ जुई जवादे, सयाजी शिंदे, विजय पाटकर, गणेश यादव, मुश्ताक खान, भारत गणेशपुरे, किशोर चौगुले, डॉ. विलास उजवणे आणि अंजली उजवणे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटातील निवडक स्टारकास्ट या प्रसंगी उपस्थित होती. आपल्या कारकिर्दीतील अशा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या चित्रपटाचा आपण भाग बनलो याचा आपल्याला अभिमान असल्याचे या कलाकारांनी म्हटले. चित्रपटाचे निर्माते अनिल कुमार जवादे आणि निलेश ओंकार म्हणाले, ''सिनेमाचा उद्देश केवळ प्रेक्षकांचे मनोरंजन करणे नाही, तर प्रेक्षकांना त्यांच्या सभोवतालच्या परिसराची आणि त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी आणि जगाला सर्वांसाठी राहण्याचे एक चांगले ठिकाण बनवण्यासाठी शिक्षित आणि प्रबोधन करणे देखील आहे. २६ नोव्हेंबर हा चित्रपट त्याच्या शक्तिशाली कथाकथनाच्या माध्यमातून हेच करण्याचा प्रयत्न करतो.''२६ नोव्हेंबर या चित्रपटाचे पोस्टर या कार्यक्रमाच्या खास पाहुण्यांपैकी एक अभिनेते/लेखक/निर्माते श्री. महेश कोठारे यांच्या हस्ते लाँच करण्यात आले. चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर ते म्हणाले, ''चित्रपटाचा ट्रेलर खूपच प्रभावी आहे. हा आपल्या काळातील एक अतिशय महत्त्वाचा चित्रपट आहे, कारण तो देशातील प्रत्येक नागरिकाच्या घटनात्मक हक्कांबद्दल बोलतो आणि समाजाला आकार देण्यामध्ये संविधानाची शक्ती दाखवतो. माझा असा विश्वास आहे की २६ नोव्हेंबर म्हणजेच संविधान दिन हा एक महत्त्वाचा दिवस आहे आणि तो दरवर्षी १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी साजरा केला जातो तसाच साजरा केला पाहिजे''. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन उराडे यांनी केले आहे, तर अनिल कुमार जवादे आणि निलेश ओंकार यांनी त्याची निर्मिती केली आहे. हा चित्रपट देशात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधानिक हक्क दिन म्हणून साजरा करण्याचे महत्त्व अधोरेखित करतो.२६ नोव्हेंबर हा चित्रपट गरिबांमधील आर्थिक असमानता आणि त्यांच्या शोषणाच्या मुद्द्यावर प्रकाश टाकतो. तो त्यांना भारतीय संविधानाने दिलेल्या त्यांच्या स्वतःच्या हक्कांसाठी लढण्यास शिकवतो आणि प्रेरित करतो. संविधान कोणत्याही एका विशिष्ट जातीचे, समुदायाचे किंवा धर्माचे नाही तर ते देशातील प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अस्तित्वात आहे हे हा चित्रपट आपल्या खास शैलीद्वारे लोकांना पटवून देतो. प्रत्येक शाळेत जाणाऱ्या मुलाला प्राथमिक स्तरापासूनच संविधानाचे महत्त्व शिकवले गेले पाहिजे आणि प्रत्येक घरात संविधानाची प्रत कशी असावी याचा देखील हा चित्रपट आग्रह धरतो. २६ नोव्हेंबर चा ट्रेलर, आणि पोस्टर लाँच कार्यक्रमादरम्यान चित्रपटाचे उत्साही लेखक/दिग्दर्शक सचिन उराडे म्हणाले, ''२६ नोव्हेंबर हा केवळ एक चित्रपट नाही, तर तो आपल्या सर्वांना आठवण करून देतो की या देशातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि प्रत्येक नागरिकाला जीवनाचा आनंद घेण्याचा समान अधिकार आहे. हा एक शक्तिशाली चित्रपट आहे ज्याचा संदेशही तितकाच शक्तिशाली आहे. मला आनंद आहे की मी हा चित्रपट माझ्या प्रिय देशाला आणि आपल्या संविधानाच्या शक्तीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला समर्पित केला आहे जे कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांना अधिकार देते. सिनेमॅटिक सीमा ओलांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या या चित्रपटाच्या उत्सवात सहभागी झाल्याबद्दल सर्वांचे आभार.'' चित्रपटात अतिशय महत्त्वाची भूमिका साकारणाऱ्या डॉ. जुई जवादे म्हणाल्या, ''मी व्यवसायाने डॉक्टर आहे आणि एक अभिनेत्री म्हणून हा माझा पहिला चित्रपट आहे. माझ्यासाठी, या चित्रपटात काम करणे हा एक अविस्मरणीय अनुभव आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी मला चित्रपटात आणि तेही इतक्या महत्त्वाच्या भूमिकेत घेण्याचा विचार केला याबद्दल मी खरोखर आभारी आहे.'' चित्रपटाचे मार्केटिंग आणि स्ट्रॅटेजी प्रमुख श्री. गिरीश वानखेडे देखील व्यासपीठावर उपस्थित होते. चित्रपटाच्या प्रमोशनशी जोडले गेल्याचा आनंद व्यक्त करताना ते म्हणाले, ''आम्ही चित्रपटाच्या प्रमोशनसाठी कोणतीही कसर सोडणार नाही. आम्ही या चित्रपटाचे प्रमोशन कोणत्याही बॉलिवूड किंवा हॉलिवूड चित्रपटाप्रमाणे करणार आहोत. इतकेच नाही तर २६ नोव्हेंबरचा ट्रेलर देखील बॉलिवूडमधील अनेक मोठया सिनेमासोबत जोडला जाईल.''चित्रपटाशी संबंधित सर्व तंत्रज्ञांना स्टेजवर बोलावण्यात आले आणि चित्रपटातील त्यांच्या योगदानाचे सर्वांनी कौतुक केले. या कृतीने सर्व तंत्रज्ञ भारावून गेले आणि त्यांनी सांगितले की, हे त्यांच्यासाठी खूप अर्थपूर्ण आहे. त्यांनी सांगितले की अशा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या चित्रपटाशी जोडले जाणे त्यांच्यासाठी छोटी कामगिरी नाही.हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून आता त्याची उत्सुकता वाढली आहे.






# मिल्लतनगर, फातेमा हाऊसिंग रस्त्यावर पथदिव्यांची वानवा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

शहरातील गोंधवणी पूलापासून पश्चिम दिशेस असलेल्या मिल्लतनगर फातेमानगर, संजयनगर तसेच सुखदा हाऊसिंग सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यांवर पथदिव्यांची मोठ्या प्रमाणात वाणवा आहे. याशिवाय याच रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड्डे आणि खाचखळगे झाले आहेत. कॅनॉलकडेला असलेल्या झाडांनी पाणी नसल्यामुळे आपल्या माना टाकल्या. ठिकठिकाणी भटक्या कुत्र्यांचा हैदोसाकडे श्रीरामपूर नगरपालिकेकडून होणाऱ्या अक्षम्य दुर्लक्षामुळे नागरिक मेताकुटीस आले आहेत.

गोंधवणी पुलापासून संजयनगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पश्चिमबाजूस झिरंगे वस्ती, मिल्लतनगर, फातेमा तसेच सुखदा हाउसिंग सोसायटी ही उपनगरे आहेत. या रस्त्यावरची वाहतूक मोठ्या प्रमाणात वर्दळीची असते. रात्रीसाठी या रस्त्यांवर फक्त एक-दोन पथदिवे कार्यरत आहेत. या मार्गांवर नगरपालिकेने तातडीने हायपावर पथदिवे बसवावेत, अशी मागणी जाहेद शेख, शाहेद बागवान, डॉ. सलीम शेख, इकबाल काकर यांनी केली आहे. याच रस्त्यांवर ठिकठिकाणी खाचखळगे आणि खड्डे तयार झाले आहेत. शिवाय याच कॅनॉलच्या कडेला असलेल्या झाडांनी माना खाली टाकल्या. गेल्या कित्येक महिन्यांपासून या झाडांना नगरपालिकेने पाण्याची सोय केलेली नाही. झाडे मोठी झाली असून झाडांना सध्या पाण्याची नितांत आवश्यकता आहे, नगरपालिकेने या भागातील सोयी सुविधांबाबत चांगला पथदर्शी प्लॅन बनवावा, तो प्रत्यक्षात राबवावा, अशी मागणी आसीफ दारूवाला, दानिश पोपटिया, मुसा पोपटिया, अन्वर तांबोळी आदींनी केली आहे. याच रस्त्यांवर दिवसा आणि रात्री अपरात्री कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात हैदोस असतो. यामुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. याबरोबरच इतरही जनावरांचा नगरपालिकेने तातडीने बंदोबस्त करावा, अशीही मागणी रमजान शाह यांनी केली.

गोंधवणी पुलापासून जाणारा रस्ता हा ईदगाह मैदानाकडे जात असून त्याची मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी दखल घेत तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी शाहरुख बागवान, रमजान शाह, शाहरुख़ शेख, अमजद शेख, फरहान शेख, इरफ़ान शेख, मुबीन कुरैशी, हुजेब शेख, दानिश पठान, नूरमोहम्मद सय्यद, अज़ीम शेख यांनी केली आहे.



# विजेच्या प्रश्नासंदर्भात मंत्री बोर्डीकर यांचा सकारात्मक प्रतिसाद- आ. राजळे

**राजेंद्र देवढे । पाथर्डी**

पाथर्डी व शेवगांव तालुक्यातील रोहित्रांच्या क्षमतेत वाढ करणे, शेतीपंप व सिंगल फेज योजनेत नवीन गावे व वाडया-वस्त्यांचा समावेश करणे, आर.डी.एस.एस. योजनेअंतर्गत ओव्हरलोड रोहित्रांच्या क्षमतेत वाढ करुन तेथे नवीन रोहीत्र टाकणे, उपकेंद्रांच्या क्षमतेत वाढ करणे व मजलेशहर, अमरापुर, जवखेडे खालसा या मंजूर उपकेंद्राची निविदा प्रक्रिया करुन तातडीने काम सुरु करण्याबाबत मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या समवेत झालेल्या बैठकीत चर्चा झाली असून या सर्व मागण्यांस त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती आमदार राजळे यांनी दिली. विधानसभा मतदारसंघातील विजेच्या समस्यांबाबत सोमवार ता. २४ मार्च रोजी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत निर्मल भवन, मुंबई येथे महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

यावेळी आ. राजळे यांनी मतदारसंघातील विजेच्या प्रश्नांवर मंत्री बोर्डीकर यांच्याकडे विविध प्रश्नांसह रिक्त असलेल्या उपकार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता ही पदे तातडीने भरण्याबाबत मागणी केली. या सर्व मागण्यांना मंत्री बोर्डीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आ. राजळे यांनी सांगितले.

यावेळी ऊर्जा विभागाचे संचलन संचालक अरविंद भादीकर, प्रकल्प संचालक प्रसाद रेश्मे, कार्यकारी संचालक वितरण दत्तात्रय पडळकर, पायाभूत आराखडा कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पंकज तगडपल्लीवार, मुख्य अभियंता अंकुर कावळे, अधीक्षक अभियंता रमेश पवार, कार्यकारी अभियंता लक्ष्मण काकडे आदी अधिकारी उपस्थित होते.

